डोंबिवली वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस. मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/वाहतूक अधिसूचना/ ५३ /२०२६ दि. ०५/०३/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसुचना :—

ज्याअर्थी, डोंबिवली वाहतूक उपविभागाचे हद्दीत दिनांक ०६/०३/२०२६ रोजी डोंबिवली पुर्व येथील अनिल आय केअर समोर, मनसे मध्यवर्ती कार्यालयासमोर, आप्पा दातार चौक, फडके रोड डोंबिवली पुर्व महाराष्ट्र नवनिर्माण सेना या पक्षाच्या माध्यमातुन छत्रपती शिवाजी महाराज जयंती तिथीप्रमाणे निमित्त शस्त्रप्रदर्शन कार्यक्रम आयोजित केला आहे. सदर कार्यक्रमास पक्षाचे कार्यकर्ते तसेच नागरिक उपस्थित राहणार आहेत. सदर कार्यक्रमामुळे फडके रोडवरील आप्पा दातार चौक ते तुळशी स्विट कॉर्नर, छेडा रोड दरम्यान वाहतुक कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :–

प्रवेश बंद–	**१)** छेडा रोड कडुन आप्पा दातार चौक मार्गे फडके रोडकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **तुळशी स्विट कॉर्नर, छेडा क्रॉस रोड** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने सरळ येवुन लोकमान्य टिळक रोडने मदन ठाकरे चौक येथुन इच्छित स्थळी जातील.
प्रवेश बंद–	**२)** फडके रोड, मदन ठाकरे चौक व नेहरू रोड गणपती मंदीर येथुन आप्पा दातार चौक मार्गे तुळशी स्विट कॉर्नर, गणपती मंदीर रोड, कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आप्पा दातार चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने स. वा. जोशी हायस्कुल मार्गे सरदार वल्लभभाई पटेल रोड मार्गे अथवा फडके रोडमार्गे सावरकर रोड, लोकमान्य टिळक रोड, आगरकर रोडने इच्छित स्थळी जातील.
नो पार्किंग –	गणपती मंदीर रोडवरील आप्पा दातार चौक ते तुळशी स्विट कॉर्नर दरम्यान रस्ता **"नो पार्किंग"** करण्यात येत आहे.
पर्यायी पार्किंग –	सदर रोडवरील वाहन चालकांना आप्पा दातार चौक ते अंबिका हॉटेल कॉर्नर दरम्यान पी १, पी २ पार्किंग उपलब्ध आहे.

सदर अधिसूचना **दि. ०६/०३/२०२६ रोजी सकाळी ०८:०० वा. ते रात्रौ २२:०० वा. पावेतो** अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सिजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सविनय सादर

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, विशेष शाखा, ठाणे
प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे, कल्याण

परिवहन व्यवस्थापक, कल्याण–डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
विभाग नियंत्रण कक्ष, राज्य परिवहन विभाग, ठाणे/कल्याण
नियंत्रण कक्ष, ठाणे/कल्याण शहर
प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर
२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्द होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे
२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

प्रत :– स.पो.आ. कल्याण वाहतूक विभाग, पोनि डोंबिवली, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर